# प्रमाणपत्र

**शंकर आंदू धडके** यांनी ''पारधी व भस्म या दलित कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीतीने लघु-प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनांतील विश्लेषण आणि विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने अन्यत्र उपयोजिला नाही.

प्रस्तुतविषय ''कादंबरी'' या वाड्.मय प्रकारातील आहे.

हा लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम.फिल. (मराठी) पदवी परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक

सोलापूर

(डॉ. राजशेखर गं. हिरेमठ)
मराठी विभाग प्रमुख
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर.

दि. 20-2-2002

प्राचार्य
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर.

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# ● प्रतिज्ञा पत्र ●

मी शंकर आंदू धडके प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, ''पारधी व भस्म या दलित कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' या विषयावरील लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम.फिल.(मराठी) या पदवी परीक्षेसाठी सादर करीत आहे.

हा लघु-प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही.

सोलापूर

दि. 20-2-2002.

अभ्यासक

शंकर आंदू धडके

# भूमिका

माझ्या लहानपणी माझ्याकडून घडलेली गोष्ट आहे. मरीआईवाल्यांचा एक सात - आठ वर्षाचा मुलगा '' भाकरी वाढ माई !'' म्हणून दारावर आला. तेव्हा मी त्याला भाकरी न वाढता दारासमोरून जातो का नाही ? म्हणून चुली समोरील तुरीच्या कोयलीने मारले व ते पाणी आणणाऱ्या माझ्या आईने पाहिले व ती मला म्हणाली, 'अरे ! दुश्मना, कुठं व कसं हे पाप फेडशील ! दारावरच्या मागतकऱ्यांना काही तरी द्याचं असतं , मारायचं नसतं.''

पुढे १२ - १५ वर्षानंतर आणखी एक घटना घडली ती अशी की, मी घरी जेवण करीत असताना माझ्या कॉलेज मधील मसणजोगी जमातीतील वर्गमित्र मसणजोग्याच्या वेशात दारासमोर आला व मला पाहताच तो सरळ पुढच्या घरी जाऊ लागला. मी त्याला पूर्णपणे ओळखले असल्याने जेवण अर्धवट सोडून त्यास हाक मारून घरी बोलावून आणले व आईचे काहीच न ऐकता जेवण करण्याचा आग्रह धरला. तेव्हा तो खूप लाजलेला होता. डोळ्यात अश्रुदाटून आले होते. तो कसा बसा चार घास जेवून निघून गेला. तेव्हा माझी आई म्हणाली, '' लहानपणी भिक्षा मागणाऱ्या मरीआईवाल्याच्या पोराला मारला होतास पण आज नको म्हणत असताना भानामती करणाऱ्या मसनजोग्याच्या पोराला जेवू घातलास, काय म्हणावं तुझ्या या शहाणपणाला ?''

मराठी विषय घेऊन पदवीधर झाल्यानंतर माझ्या लहानपणातील माझ्या आईचे म्हणणे मला आठवू लागले. मी आस्थेने, आवडीने दलित साहित्याचे वाचन केले. व आईच्या म्हणण्याप्रमाणे भटक्या विमुक्तांचा तिरस्कार न करता सहानुभूतीतून त्यांच्या दर्दभरी कहाणीच्या वाचनांचा छंद जडला.

१९६० च्या नंतर उदयास आलेल्या दलित साहित्यात दलित जीवनानुभव अभिव्यक्त झाले आहेत. दलिताचे विदारक जीवन चित्रण साहित्याच्या कथा, कादंबरी, काव्य, नाटक, आत्मकथने या प्रकारांतून अनेक साहित्यिकांकडून चित्रीत झाले आहे. पण शिक्षणाच्या प्रसारामुळे दलित जीवनातील अज्ञान, दारिद्रय , दुःख, अन्याय, जुलूम , अत्याचार कमी होत आहेत कारण शिक्षणामुळे काही अंशी सवर्णीयांच्या मनात दलितांविषयी सहानुभूती निर्माण झाली आहे. म्हणुन सवर्णीयांच्या कडून आज त्या पिडेतून प्रेमाचे झरे वहात आहेत. याचा प्रत्यय दलितेतरांनी दलिता विषयीच्या सहानुभूतीने लिहिलेल्या दलित साहित्यातून येतो. तसेच 'भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र राज्य' या सेवाभावी संस्थेकडून महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी

भटक्या विमुक्तांना स्थिर जीवन मिळवून देण्याचे व भटक्या विमुक्तांच्या समाज पुर्नरचनेचे (चोरी न करता कष्ट करून जगण्यास शिकविणे, मुलभूत हक्क मिळवून देणे) प्रयत्न केले जात आहेत. या कार्यामागील प्रेरणा म्हणजे दलिताविषयीची सहानुभूती असे म्हणता येईल.

''पीडेतून आता प्रेमाचे झरे वहात आहेत'' या प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या विचाराप्रमाणेच पूर्वी पारधी म्हणजे चोर व मसनजोगी म्हणजे भानामती, चेटूक करणारा समाजकंटक व्यक्ती आहे असे समजणारे , त्यांचा तिरस्कार करणारे, त्यांना त्रास देणारे सवर्णीय लोक आज त्यांच्या जीवन उद्धारण्यासाठी प्रयत्न करू पहात आहेत. या आशयाची शंकरराव खरात यांची 'पारधी' व उत्तम बंडू तुपे यांची 'भस्म' ह्या कादंबऱ्या वाचनात आल्या. या कादंबरीतील मुख्य कथानायक पारधी व मसनजोगी या भटक्या जमातीचे आहेत. त्यांच्या स्थिर जीवनाकरिता अनुक्रमे पारधी मध्ये वकील व भस्ममध्ये सरपंच यांनी प्रयत्न केले आहेत. पण सर्वार्थाने अनुसूचित जमाती मधील पारधी व भटक्या विमुक्तातील मसनजोगीचे जीवन स्थिर झाले आहे का ? याचा वेध घेण्यासाठी दोन वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेल्या समानधर्मी कादंबऱ्याचा साम्य व भेद या स्तरावर तुलनात्मक अभ्यास करण्याकरिता'' पारधी व भस्म या दलित कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' या विषयावर लघु प्रबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

'पारधी ' व 'भस्म' या दोन्ही कादंबऱ्याचे मराठी साहित्यात वैशिष्ठ्यपुर्ण स्थान आहे. या दोन्ही कादंबऱ्यांचे लेखक दलित समाजातील असले तरी त्यांनी दलितांपेक्षाही अधिक अस्थिर व भयानक जीवन जगणाऱ्या भटक्या जमातीचे चित्रण करून मराठी साहित्याचे अनुभवविश्व व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ नवा विषय घेतला म्हणून नव्हे तर एका नव्या विषयावर समर्थपणे लेखन केल्याने आणि ते लेखन सामाजिक व वाडःमय दृष्ट्या चांगले असल्याने त्यांना महत्व प्राप्त होते.

परंतु मराठी साहित्याने आणि समीक्षकाने या दोन्ही कादंबऱ्यांची फारशी दखल घेतली नाही म्हणुन अभ्यासासाठी हा विषय निवडला. या दोन्ही कादंबऱ्यातील लेखनाचा वाडःमयीन दृष्ट्या विचार यात केला आहेच. पण या दोन्ही कादंबऱ्यांचे सामाजिक दृष्ट्या महत्व असल्याने त्यातील समाज, त्यांची संस्कृती, त्यांच्या रुढी, चालीरिती, परंपरा , श्रद्धा - अंधश्रद्धा यांचा सामाजिक दृष्टिने वेध घेण्याचा अधिक प्रयत्न केला आहे. या दोन्ही कादंबऱ्यांतील पात्रांचे जीवन हे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील असल्याने आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित समाजाप्रमाणे भटक्या व विमुक्त जमातीतील परिवर्तन येवू लागले परंतू या

परिवर्तनासाठी या मागासवर्गीय समाजातील नायकांना प्रतिष्ठित समाजाशी, शासकीय यंत्रेणेशी आणि त्याच बरोबर स्वतःच्या समाजाशीही संघर्ष करावा लागतो. त्या संघर्षाचे प्रभावी चित्रण या दोन्ही कादंबऱ्यातून आढळते. त्यामुळे या दोन्ही कादंबऱ्यांचा मला संशोधनाच्या दृष्टिकोनातुन अभ्यास करावा असे वाटते.

या संदर्भात मी मार्गदर्शक डॉ. राजशेखर गं. हिरेमठ यांच्याशी चर्चा केली. तेंव्हा माझी ही भुमिका व माझा दृष्टिकोन आवडला आणि त्यांनी हा विषय निवडण्यास मान्यता दिली. आणि त्या दृष्टिने मार्गदर्शनही केले.

हा अभ्यास करतांना मराठीत दलित साहित्यावर लेखन करणाऱ्या शंकरराव खरात, यशवंत मनोहर गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, बाळकृष्ण कवठेकर, भालचंद्र फडके, अर्जुन डांगळे, रा. ग. जाधव अशा अनेक लेखकांचे समीक्षा ग्रंथ उपयोगी पडले. याचा मला कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो. तसेच सदर लघु-प्रबंधाच्या लेखनाच्या कालखंडात प्रा. जगदीश खानापूरे, प्रा. ओमप्रकाश तळेकर, प्रा. एस.एस. वाले, प्रा. सुहास पुजारी यांचे र्मादर्शन उपयुक्त ठरले आणि अक्कलकोट येथील महाविद्यालयाचे पूर्वीचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रा. बसवराज कोनापूरे व सध्याचे प्रभारी प्राचार्य, एम.ए. शेख, आणि उप प्राचार्य, प्रकाश हारकूड तसेच संगमेश्वर महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ. प्रा. आर.एस. ढेपे यांचेही सहकार्य लाभले. याखेरीज अक्कलकोट महाविद्यालय आणि संगमेश्वर यांच्या कडील ग्रंथालयांचा संदर्भासाठी खूपच उपयोग झाला हे ही मला नमूद करावेसे वाटते. वरील व्यक्तींच्या व संस्थांच्या सहकार्याने व प्रेरणेने मला संशोधनाची ही पहिली पायवाट धुंडाळता आली म्हणून त्या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

ही पायवाट चालतांना मला अनेकांचे सहकार्य लाभले त्यांचा ही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो यात आई गं. भा. रत्नाबाई, पत्नी - सौ. मीनाक्षी तसेच माझे नातेवाईक प्रा. चंद्रकांत शेरखाने, शिवाजी खरटमल आणि प्रस्तुत लघु-प्रबंधाचे मुद्रण करणारे श्री समर्थ कॉम्प्युटर्स, अक्कलकोट यासर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभार मानतो.

– शंकर आंदू धडके

# अनुक्रमणिका

## प्रकरण पहिले

पृष्ठ क्रमांक

**दलित साहित्य प्रेरणा, स्वरुप व परामर्श - १ ते १५**

१. दलित साहित्याच्या व्याख्या

२. दलित कोण ? या संज्ञेची व्यापकता

३. दलित समाज परिवर्तन : एक नवि प्रेरणा

४. 'पारधी' व 'भस्म' : एकाच विषयावरील दोन कादंबऱ्या

५. भटक्या व विमुक्त जमातीचे मराठी साहित्यात चित्रण : परामर्श

## प्रकरण दुसरे

**कादंबऱ्यांतील कथानकाचे साम्य - भेद - १६ ते ५४**

१. कथानक

अ) 'पारधी' कादंबरीतील कथानक

ब) 'भस्म' कादंबरीतील कथानक

२. कथानकातील घटना प्रधानता आणि स्वभाव प्रधानता

३. दोन्ही कादंबऱ्यांच्या कथानकातील साम्य भेद

अ) साम्य

ब) भेद

४. परिवर्तनशिलता

१) परिवर्तनाच्या प्रेरणा नविन

२) दोन्ही कादंबऱ्यांतील परिवर्तनशिलतेचे स्वरुप

अ) 'पारधी' कादंबरीतील परिवर्तनशिलता

ब) 'भस्म' कादंबरीतील परिवर्तनशिलता

५. कादंबऱ्यांतील संघर्षाचे स्वरुप

अ) 'पारधी' कादंबरीतील संघर्ष

ब) 'भस्म' कादंबरीतील संघर्ष

६. दोन्ही कादंबऱ्यांतील सामाजिक संस्कृतीचे चित्रण


## प्रकरण तिसरे


**'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांतील पात्रसृष्टी - ५५ ते ७८**

१. 'पारधी' कादंबरीतील नायक : 'चित्र्या'

२. 'भस्म' कादंबरीतील नायक : 'शंकर'

३. 'पारधी' कादंबरीतील नायिका : 'खारी'

४. 'भस्म' कादंबरीतील नायिका : 'पारु'

५. 'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांतील : सत्प्रवृत्त पात्रे

६. 'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांतील : खल प्रवृत्त पात्रे

७. 'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांतील : पात्र चित्रणाचा अभिनव प्रयोग

८. 'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांच्या : पात्र चित्रणातील साम्य-भेद


## प्रकरण चौथे


**'पारधी' व 'भस्म' कादंबऱ्यांतील अभिव्यक्ती सौंदर्य - ७९ ते १०५**

१. 'पारधी' व 'भस्म' या कादंबऱ्यांची अर्थ पुर्ण शीर्षके

२. वातावरण निर्मिती

अ) 'पारधी' कादंबरीतील वातावरण

ब) 'भस्म' कादंबरीतील वातावरण

क) दोन्ही कादंबऱ्यांच्या वातावरण चित्रणातील साम्य भेद

३. भाषा शैली

अ) 'पारधी' कादंबरीतील पात्रांची भाषा

ब) 'भस्म' कादंबरीतील पात्रांची भाषा

क) भाषा शैलीची आणखी काही वैशिष्ट्ये

१) 'पारधी' कादंबरीतील शब्द

२) 'पारधी' कादंबरीतील वाक्य प्रचार व म्हणी

३) 'भस्म' कादंबरीतील शब्द

४) 'भस्म' कादंबरीतील वाक्य प्रचार व म्हणी

४) निवेदन शैली

१) 'पारधी' कादंबरीतील निवेदन शैली

२) 'भस्म' कादंबरीतील निवेदन शैली

**प्रकरण पाचवे**

**समारोप व निष्कर्ष** - **१०६ ते ११५**

**संदर्भ ग्रंथ सुची** - **११६ ते १२३**